‘परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्थेची’ रणधुमाळी

मविआ-महायुतीतील इच्छुकांचे उमेदवारीसाठी प्रयत्न सुरू

लोकसत्ता वार्ताहर

परभणी : राज्यातील एकूण १६ स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघांतील निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर झाला असून, यात परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाचाही समावेश आहे. दोन वर्षांपूर्वीच या मतदारसंघातल्या विधान परिषद सदस्यत्वाचा कार्यकाळ संपुष्टात आला असताना रखडलेली ही निवडणूक आता होऊ घातली आहे.

या निमित्ताने परभणी- हिंगोली या दोन्ही जिल्ह्यांचा राजकारणाची रणधुमाळी पुन्हा एकदा सुरू होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थामधील सदस्य या निवडणुकीसाठी मतदार असले, तरी दोन्ही जिल्ह्यांचे राजकारण या निमित्ताने ढवळून निघणार आहे. संपूर्ण निवडणुकीदरम्यान कोणतेच प्रचाराचे मुद्दे चर्चेला येत नाहीत, तर केवळ अर्थपूर्ण प्रचाराच्या माध्यमातून आणि मतदारांच्या ‘थेट’ भेटीतून या निवडणुकीचा प्रचार होतो. तसेच, निवडणुकीदरम्यान अज्ञात स्थळी सहलीला रवाना झालेले मतदार ऐन मतदानाच्या दिवशी प्रकटतात, हे या निवडणुकीचे वैशिष्ट्य आहे.

परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीचे १८ जूनला मतदान, तर २२ जूनला मतमोजणी होऊन निकाल जाहीर करण्यात येणार आहे. १ जून ही उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे. ४ जूनला उमेदवारी अर्ज मागे घेण्यात येणार आहेत.

जून महिन्याच्या आरंभीच या निवडणुकीच्या हालचाली गतिमान होणार असल्या, तरी दोन्ही जिल्ह्यांत महाविकास आघाडी व महायुती या दोन्ही बाजूंनी उमेदवारी मिळावी यासाठी इच्छुक उमेदवारांचे प्रयत्न सुरू झाले आहेत. परभणी-हिंगोली स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील आमदार विप्लव बाजोरिया यांची मुदत २१ जून २०२४ रोजी संपली. तथापि जिल्ह्यात पालिका, महापालिका, जिल्हा परिषद या सर्वच निवडणुका रखडलेल्या होत्या. परिणामी या दोन्ही जिल्ह्यांतल्या स्थानिक स्वराज्य संस्थांचा मतदारसंघ असलेल्या विधान परिषदेची निवडणूकही रखडली.

महाविकास आघाडी व महायुती या दोन्ही पक्षांचे उमेदवार लवकरच जाहीर होतील, त्यानंतर निवडणूकीला गती येईल. दरम्यान, महायुतीकडून भारतीय जनता पक्षाने उमेदवारीवर दावा करायला प्रारंभ केला आहे. दोन्ही जिल्ह्यांतील स्थानिक स्वराज्य संस्थामध्ये सर्वाधिक सदस्य भाजपचे असल्याने उमेदवारी भाजपला मिळावी, अशी मागणी भाजपच्या गोटातून सुरू झाली आहे. महाविकास आघाडीच्या वतीने शिवसेनेमार्फत (ठाकरे) उमेदवारीसाठी जोरकस प्रयत्न केले जात आहेत. काँग्रेस व शरदचंद्र पवार राष्ट्रवादी काँग्रेस या पक्षांची भूमिकाही महत्त्वाची मानली जात आहे.

लोकसभा, विधानसभा निवडणूकीपाठोपाठ जिल्ह्यातील महापालिका पालिका व जिल्हा परिषद निवडणुकांनी ग्रामीण भागातले वातावरण ढवळून निघाले होते. या सर्व निवडणुका संपल्यानंतर बराच काळ राजकीय वातावरण शांतच होते. या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा एकदा राजकीय धुरळा उडणार आहे.

उमेदवार निश्चितीच्या संदर्भात धनशक्ती हाच महत्त्वाचा निकष या निवडणुकीत मानला जात असल्याने कोणकोणते उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात पुढे येतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

महापालिकेच्या तिजोरीत खडखडाट, बाराशे कोटींची थकबाकी

छत्रपती संभाजीनगर : छत्रपती संभाजीनगर शहराचा कारभार पाहणाऱ्या महापालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांमधील समन्वयाचा अभाव, मालमत्ता कर वसूल करण्याबाबत दाखवलेल्या उदासीनतेमुळे थकबाकीचा तब्बल साडे बाराशे कोटींवर पोहोचलेला आकडा, मनपाच्या मालमत्तांबाबतची अनभिज्ञता, तिजोरीतील खडखडाट, मनपावरील कर्जाचा डोंगर, चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या वेतनालाही पैसा नसल्याची परिस्थिती, असे चित्रच सोमवारी स्थायी समितीच्या भर सभेत उभे राहिल्याचे पाहावला मिळाले.

स्तानाध्यांसह विरोधी पक्षातील नगरसेवकांनी विचारलेल्या विविध प्रश्नानुत्र अपेक्षित उत्तरे मिळू न शकल्याने वरील माहिती समोर आली आहे. त्यातच शहराला महिन्यातून केवळ अडीचवेळेच पाणी मिळत असून, पाण्यासाठी नागरिक आमचे लाज काढत आहेत, अशी अगतिकतासही सत्ताधारी पक्षातील नगरसेवकांनी बैठकीत व्यक्त केल्याने चार तासांपेक्षा अधिक काळ चाललेली स्थायी समितीची बैठक एक प्रकारे वादळीच ठरली.

सभापती अनिल मकरिये यांच्या अध्यक्षतेखाली सभेला सुरुवात झाली. बैठकीत किती मालमत्ताधारक कर भरतात तर कुठल्या क्षेत्रातून कर भरणा होत नाही, मोबाईलच्या केंपन्यांकडे, शासकीय कार्यालये, शैक्षणिक संस्थांकडे किती कोटींचा आणून दिले. तर एका पत्रावर पाच लाख मालमत्ता असल्याकडे नगरसेवक सुरेंद्र कुलकर्णी यांनी लक्ष वेधले. त्यावर नव्हाळे यांनी एका घरासह तेथील किरायादाराकडून टाकण्यात येणाऱ्या कचऱ्यामुळे पाच लाखांची सेषा राखणे शक्य असल्याचे स्पष्ट केले. शहरातील मालमत्ताधारकांकडे १ हजार २७९ कोटींची थकबाकी असून, वसुली केवळ ३५ कोटी ८७ लाख एवढीच असल्याचे आकडेवारीसह सांगितले.

SMFG Grihashakti

एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कं. लि.

कॉर्पोरेट कार्यालय: ५०३ ऑफ ५वा मजला, जी-ब्लॉक, इन्फ्यान सेंटरी, सेंचेरी मेन रोड, वाई कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१
नोंदणीकृत कार्यालय: कॉमर्शीयल आर्थो पार्क, टॉवर बी, रुम नंबर, ११११, फ्लॅट एन्ड्रूसी रोड, पोस्ट, चेन्नई- ६००११६, तीरन

स्थावर मालमत्ता गहाणदार ताबा सूचना (परिशिष्ट ४) नियम (७/१)

ज्याअर्थी निम्नस्वाक्षरीकार हे **एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनी लि.**, एक हाऊसिंग फायनान्स कंपनी [नोंदणत हाऊसिंग बँकेत (पूर्वपंथ आरबीआयच्या मालकीची) नोंदणीकृत] (यापुढे "एसएमएफएफसी" म्हणून संदर्भित) यांचे **अधिकृत अधिकारी** आहेत त्यांनी सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४, २००२) अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ३ सहवाचता निर्देशित कलम १३(१२) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, निर्देशित कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत खाली नमूद केलेली मागणी सूचना जारी केली आहे ज्यामध्ये कर्जदार (खाली नमूद केलेली नावे) असल्याने, तुम्हाला सदर निर्देशित सूचना मिळल्यापासा तारखेपासून ६० दिवसांच्या आत निर्देशित सूचनेत नमूद केलेली रक्कम आणि त्यावरील व्याज पत्र करण्याचे आवाहन केले आहे. खाली नमूद केलेल्या कर्जदारांनी सदर पत्र करण्या अयशस्वी झाल्यामुळे, येथे नमूद केलेल्या कर्जदारांना आणि सर्वसाधारण जनतेला सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकार यांनी त्यांना सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) नियम, २००२ च्या नियम ८ सहवाचता निर्देशित कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (४) अंतर्गत त्यांच्या अधिकारांचा वापर करून येथे वर्णन केलेल्या **मालमत्तेचा ताबा** घेतला आहे. वर नमूद केलेल्या कर्जदारांना, विशेषतः, आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध केले जाते की, त्यांनी सदर मालमत्तेचा व्यवहार करू नये आणि मालमत्तेचा कोणताही व्यवहार हा एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कंपनीच्या, प्रभारासह, आणि अधीन त्यावरील व्याज यासाठी "एसएमएफएफसी" यांच्या शुल्काच्या विषयाधीन असेल.

अ. क्र.	कर्जदाराचे/ जामीनदाराचे नाव/ एलएएन	सुरक्षित मालमत्तेचे वर्णन (स्थावर मालमत्ता)	मागणी सूचना तारीख आणि रक्कम	ताबा तारीख
१.	एलएएन: ६०६२०७५१०६१९३३० आणि ६०६२०७२१०२१५९७०. १. भास्कर बंडू गायकवाड २. देवका भास्कर गायकवाड ३. मे. वैष्णवी ऑटो कनाल्टन्ट	घर/ मिळकत क्र. १०८, वॉर्ड क्र. १५, सर्वेक्षण क्र. २६८, अहिल्यादेवीनगर, सतोषी माता मंदिराजवळ, गंगापूर, औरंगाबाद	रु. २१,४६,०२९.२६/- (ए कवीस लाख शेहेचाळीस हजार एकोणतीस आणि सव्वीस पैसे फक्त) दि. ०९.०१.२०२६ रोजीनुसार	१५.०५.२०२६

ठिकाण: औरंगाबाद, महाराष्ट्र
दिनांक: १५.०५.२०२६

सही/-, अधिकृत अधिकारी,
एसएमएफजी इंडिया होम फायनान्स कं. लि.

MANAPPURAM HOME FINANCE LTD.

मणप्पुरम होम फायनान्स लिमिटेड
पूर्वीची मणप्पुरम होम फायनान्स लि.
CIN : L65923KL2010PLC039179 **नोंदणीकृत कार्यालय :** ८ / ५९६ ए, पद्मपाम बिल्डिंग, औरंगा स्थानी रिक्लमेशन, वेलम - त्रिशूर रोड, त्रिशूर, त्रिशूर, केरळ - ६८०००७.

मागणी सूचना

ज्याअर्थी, "मणप्पुरम होम फायनान्स लि."च्या अधिकृत अधिकारींनी, येथे खालील नोंदणीकृत कार्यालय - ८ / ५९६ ए, पद्मपाम बिल्डिंग, औरंगा स्थानी रिक्लमेशन, वेलम - त्रिशूर रोड, त्रिशूर, त्रिशूर, केरळ - ६८०००७ आणि पत्रासाठी शाखा कार्यालय (यापुढे "एमएचएलकडून" म्हणून संदर्भित) करून अधिनियम, १९५६ अंतर्गत एक नोंदणीकृत कंपनी म्हणून सादर, निर्देशित नियम, नियम व संकल्प, नवी दिल्ली यांच्या द्वारा निर्मित केलेले दिनांक १८ डिसेंबर, २०१० अधिसूचना क्र. एस. ओ. ३९६६ (ई) यानुसार सेकीयुरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲंड सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (यापुढे "ॲक्ट" म्हणून संदर्भित) च्या सेक्शन २ च्या उप-सेक्शन (१) च्या क्लॉज (ए) च्या अर्थीकडून एक निर्दोष संस्था, इतर नोंदणीकरीय, निगम युनिट्सची प्रदेशी आणि/किंवा वांध्यकामकारीता आणि कार्यांच व्यवसाय चालविणारी आणि ज्याअर्थी "एमएचएलअंतरगत"कडून प्राप्त केलेल्या कर्जाची सवलती मुद्दल मिळकतीच्या संबंधात ८ मध्ये नमूद केलेल्यानुसार कर्जाचे / सह-कर्जदार यांच्या खाते / सह-कर्जदारांच्या खाते आणि त्यावरील व्याज आणि इतर शुल्कांच्या संबंधात खाली नमूद केलेल्या कर्जदारांनी / सह-कर्जदारांनी त्यांच्या खाते / सह-कर्जदारांच्या खाते आणि त्यावरील व्याज आणि इतर शुल्कांच्या संबंधात खाली नमूद केलेल्या कर्जाच्या सवलती मुद्दल मिळकतीच्या संबंधात ८ मध्ये नमूद केल्यानुसार कर्जाचे / सह-कर्जदार